वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २५ /२०२६ दि. २३/०१/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे महानगरपालिका ठाणे च्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने वागळे प्रभाग समिती प्रभाग क्र.१६, १७, १८ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, आ.टी. आय. सर्कल, वागळे इस्टेट, ठाणे येथे दिनांक १४/०१/२०२६ रोजी मतपेटया वाटप, दि.१५/०१/२०२६ रोजी मतपेटया जमा तसेच दि.१६/०१/२०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** २२ नं.सर्कल कडून आय.टी.आय. कडे रोडने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **२७ नंबर** चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सरदची वाहने २७ नंबर चौक येथून डावीकडे वळून श्रीनगर/शांतीनगर मार्गे किंवा उजवीकडे वळून सीपी तलाव मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** शांतीनगर व रामनगर मार्गे आय.टी.आय. कडे रोडने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धर्मवीर** चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने शांतीनगर, महिंद्रा शोरुम कट व रामनगर, वागळे बस डेपो मार्गे इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	आय.टी.आय सर्कल ते टाटा फायजन कट पर्यत जाणाऱ्या येणाऱ्या दोन्ही वाहीनीवर **नो पार्किंग** क्षेत्र करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक १४/०१/२०२६ रोजी सकाळी ०६:०० वा. ते रात्रौ २१:०० वा. पावेतो, दिनांक १५/०१/२०२६ रोजी सायंकाळी १६:०० वा. ते रात्रौ २४:०० वा. पावेतो व दिनांक १६/०१/२०२६ रोजी सकाळी ०६:०० वा. ते सायंकाळी १७:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावी